## 5. भारतीय संघराज्य

**संघराज्याचे प्रकार -**

1) **केंद्राकर्षी संघराज्य :-** स्वतंत्र असलेले अनेक प्रदेश एकत्र येऊन संघराज्य निर्माण करतात.
उदा. अमेरिका - 13 स्वतंत्र वसाहती एकत्र करुन निर्माण केले.

2) **केंद्रोत्सारी संघराज्य :-** अखंड भूप्रदेश एकत्र करुन राज्यांना स्वयत्ता प्रधान करुन संघराज्याची निर्मिती केली जाते.
उदा. कॅनडा (10 प्रांत), भारत (28 घटकराज्ये, 8 केंद्रशासित प्रदेश)

**भारतीय घटनेतील संघराज्याची वैशिष्ट्ये :**

**दुहेरी शासनपध्दती -**

- संघराज्य सरकार संरक्षण, परकीय कामकाज, चलन, दळणवळण यांसारख्या राष्ट्रीय महत्वाच्या क्षेत्रात कार्य करतात. तर घटकराज्य सरकारे सार्वजनिक सुव्यवस्था, कृषि, आरोग्य, स्थानिक शासन, सहकार यांसारख्या प्रादेशिक व स्थानिक महत्वाच्या क्षेत्रात कार्य करतात.
- **लिखीत राज्यघटना -** जगातील सर्वात मोठी 251/277 पानांची.
- **अधिकारांची विभागणी -** घटनेने केंद्र व राज्य यांमधील अधिकारांची विभागणी 7 व्या अनूसूचीमधील संघसूची (मूळ 97, 100 विषय सध्या 98), राज्य सुची (मुळ 66, 61 विषय सध्या 59), व समवर्ती सुची (मुळ 47, 52 विषय सध्या 52) यांच्या स्वरुपात देण्यात आले आहे.
- **ताठर घटना -** भारतीय राज्यघटनेमध्ये काही कलमात बदल करता येत नाही.
- **घटनेची सर्वोच्चता -** भारतीय जनतेद्वारे तयार करण्यात आलेल्या घटनेला सर्वोच्चता प्रधान करण्यात आली आहे. ज्याद्वारे कारभार चालतो.
- **स्वंतत्र न्यायव्यवस्था -** याची 2 उद्दिष्टे आहेत.
  1) न्यायिक पुनर्विलोकनाचा अधिकार वापरुन घटनेच्या सर्वोच्चतेचे संरक्षण करणे.
  2) केंद्र व राज्यांतील तसेच वेगवेगळ्या राज्यांच्या दरम्यानच्या विवादांचे निवारण करणे.

**द्विगृही संसद**

घटनेने द्विगृही संसदेची तरतूद केली आहे

1) **वरिष्ठ सभागृह (राज्यसभा) -**

- संघराज्यातील घटक राज्यांचे प्रतिनिधित्व राज्यसभा करते.
- केंद्राचा हस्तक्षेप टाळून घटकराज्यांचे हितसंबंध जपण्यासाठी संघराज्यीय संतुलन राखणे ही आहे. जबाबदारी राज्यसभेची (जरी कमी अधिकार संपन्न सभागृह असले तरी)

**2) कनिष्ठ सभागृह (लोकसभा) -**

- प्रत्यक्ष लोकांचे प्रतिनिधीत्व लोकसभा करते.
- भारताचे वर्णन संघराज्य या शब्दाऐवजी राज्याचा संघ असा करण्यात आला असून. संघराज्यातून फुटून जाण्याची किंवा संघराज्याची कराराद्वारे निर्मिती करण्याचा अधिकार दिलेला नाही. त्यामुळे भारत राज्याचा संघ म्हणुन ओळखला जातो. 1963 च्या 16 व्या घटनादुरुस्तीने असे सांगितले आहे की, भारतीय संघराज्य व्यवस्था अमेरिकाऐवजी कॅनडाच्या धर्तीवर असून कॅनडाशी ती मिळती-जुळती घेते.

❍ **भारतीय घटनेतील एकात्मक वैशिष्ट्ये -**

**1) प्रभावी केंद्र -** अधिकार विभागणीत केंद्राला झुकते माप.
उदा. अमेरिका.

**2) घटकराज्ये अभंजक नाही -**

- भारतीय घटकराज्यांना भूप्रादेशिक एकात्मतेचा अधिकार प्राप्त नाही.
- भारतीय संघराज्याचे स्वरुप राज्यांचा अभंजक संघ आहे.
- याउलट अमेरिकन संघराज्य हे अभंजक राज्यांची अभंजक संघ आहे.

**3) एकच राज्यघटना -** संघराज्यात राज्यांना स्वतःची घटना असते.

- अपवाद - जम्मू व कश्मिर या राज्याला कलम 370 अंतर्गत स्वतःची घटना निर्माण करण्याचा विशेष अधिकार

**4) घटनेची लवचिकता -**

- घटनेचा बराचसा भाग साध्या बहुमताने बदलता येतो.

**5) घटकराज्यांच्या प्रतिनिधीत्वामध्ये असमानता -**

- राज्यसभेत सदस्य 1 पासून 31 पर्यंत घटक राज्यातून निवडून दिले जातात.
- USA मध्ये राज्यांच्या समान प्रतिनिधीचे तत्त्व आहे. त्यामुळे अमेरिकन सिनेटमध्ये प्रत्येक राज्याचे 2 असे 100 प्रतिनिधी असतात.

**6) आणीबाणीसंबंधी तरतुदी -**

- 3 प्रकारच्या आणीबाणीची तरतुद आहे.
  1) राष्ट्रीय, 2) राज्य, 3) वित्तीय
- आणीबाणीच्या दरम्यान सर्व सत्ता केंद्राच्या हाती एकवटते.

**7) एकच नागरिकत्व -**

- USA, स्वित्झरलँड व ऑस्ट्रेलिया या संघराज्यामध्ये मात्र दुहेरी नागरिकत्वाची तरतुद - राष्ट्रीय नागरिकत्व, राज्य नागरिकत्व

**8) एकात्मिक न्यायव्यवस्था -**

- USA मध्ये दुहेरी न्यायव्यवस्था आहे जेथे, **संघराज्यीय कायदे** संघराज्ये न्यायव्यवस्थेद्वारे, **राज्यांचे कायदे -** राज्यस्तरीय आमलात आणले जातात.

**9) अखिल भारतीय सेवा :**

- IAS, IPS, IFS या केंद्र व राज्यांमध्ये सामाईक सेवा आहेत. या सेवांतील सदस्यांची भरती व प्रशिक्षण केंद्र सरकारकडून होते.

**10) एकात्मिक लेखापरीक्षण व्यवस्था -**

- भारताचा महालेखापरीक्षक हा केंद्र व राज्य सरकारांचा लेखापरीक्षण करतो.
- नेमणुक व पदमुक्ती - राष्ट्रपती
- अमेरिकन महालेखापरीक्षकांची राज्यांच्या लेखांबाबत कोणतीही भूमिका नसते.

**11) राज्यपालाची नेमणूक -**

- हा राज्याचा प्रमुख असतो (कार्यकारी प्रमुख)
- नेमणुक - राष्ट्रपती सही शिक्क्यांनी करतात.

**12) एकात्मिक निवडणूक यंत्रणा -**

- निवडणुक आयोग 1) केंद्रीय कायदेमंडळ 2) राज्यविधीमंडळ निवडणुका घडवून आणतो.
- आयोगाची निर्मिती राष्ट्रपतीमार्फत केली जाते. त्यात राज्यशासनांची भूमिका नसते.
- USA मध्ये संघराज्यीय व राज्यस्तरीय निवडणूकांसाठी वेगवेगळी तरतुद.

**13) राज्य विधेयकावरील नामाधिकार :**

- **के. सी. व्हेअर -** भारतीय घटनेचे अर्ध - संघराज्यीय असे वर्णन केले.
- **पॉल ॲपल्बी** यांनी भारतीय व्यवस्थेस 'अती कमालीचे संघराज्यीय' असे संबोधले.
- **मॉरिस जोन्स** - वाटाघाटीचे संघराज्य / एकात्म / अद्भूत.
- **इबोर जेनिंग -** प्रभावी केंद्रीकरणाची प्रवृत्ती असलेले संघराज्य.
- **ग्रॅनवील ऑस्टिन** - सकारात्मक संघराज्य.
- **डॉ. बी. आर. आंबेडकर** मते - "घटना जेवढ्या प्रमाणात दुहेरी राज्यव्यवस्था निर्माण करते तेवढ्या प्रमाणात ती संघराज्यीय घटना आहे.
- **के.व्ही. राव -** केंद्रीकरण झालेले संघराज्य.
- **S. R. Bomay** खटला (1994) सर्वोच्च न्यायालयाने घटना संघात्मक असल्याचे स्पष्ट सांगितले तसेच संघराज्यवाद हे घटनेचे मूलभूत वैशिष्ट्ये आहे.
- भारतीय संघराज्यवाद 2 गोष्टींची तडजोड करण्याचा प्रयत्न आहे.

1) अधिकारांची सामान्य विभागणी करण्याची गरज, ज्यामध्ये राज्ये आपल्या स्वतःच्या चौकटीत स्वायत्त असतील.
2) राष्ट्रीय एकात्मतेची आवश्यकता आणि अपवादात्मक परिस्थितीमध्ये मजबूत केंद्राची गरज.

- भारतीय राजकीय व्यवस्थेच्या कार्यचालनाच्या पुढील प्रवृत्तीवरुन तिच्या (Iederal Sprit) संघराज्यीय आत्म्याची प्रचीती येते.

1) राज्यांदरम्यान सीमा / प्रादेशिक विवाद
   उदा. महाराष्ट्र व कर्नाटक दरम्यान बेळगाववरुन विवाद
2) नदी जल वाटपावरुन राज्यांमध्ये विवाद
   उदा. कर्नाटक व तामिळनाडू कावेरी जल वाटप विवाद
3) आंध्र प्रदेश, तामिळनाडू, महाराष्ट्र, पंजाब इ. राज्यात प्रादेशिक पक्षांचा उदय व सरकार स्थापना.

4) प्रादेशिक आकांक्षांच्या पूर्ततेसाठी नवीन राज्यांची निर्मिती उदा. मिझोराम, झारखंड, तेलंगणा.

5) विकास गरजा पूर्ण करण्यासाठी राज्यांची केंद्राकडून होणाऱ्या हस्तक्षेपाचा विरोध अधिक वित्तीय अनुदानांची मागणी.

6) राज्यांनी स्वायत्तेची मागणी व केंद्राकडून होणाऱ्या हस्तक्षेपाचा विरोध.

7) केंद्राच्या कलम 368 च्या वापराबाबत सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या विविध पध्दतीची मर्यादा.

8) केंद्र स्तरांवर युती सरकारची प्रस्थापना, ज्यांमध्ये राज्यस्तरीय पक्षांची निर्णायक भूमिका.

9) वित्त आयोगामार्फत केंद्रीय कर उत्पन्नातील राज्यांना दिला जाणारा वाढता हिस्सा.